**युद्धात, युद्धजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सर्वच क्षेत्राअंतर्गत सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत/ देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या आणि अपंगत्व आलेल्या जवानांना तसेच महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेअंतर्गत आर्थिक मदत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः मासैम-२०२५/प्र.क्र.३११/२८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ३१.०३.२०२६

**वाचा:**

१. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: मासैम-१०९९/१६६१/प्र.क्र.१२६/९९/२८, दि. ४/१०/२०००

२. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: मासैम-२०१६/प्र.क्र.९२(१)/२०१६/२८, दि. ३०/११/२०१६.

३. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: मगौपु-२०१७/प्र.क्र.३६०/२८, दि. ३१/०१/२०१९

४. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: मासैम-२०१९/प्र.क्र.६८/२०१९/२८, दि. २/८/२०१९

**प्रस्तावना:-**

०१. युध्दात, युध्दजन्य परिस्थितीमध्ये, तसेच देशातील सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत / देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या राज्यातील सैनिकांच्या वारसांना/ अपंगत्व आलेल्या सैनिकांना/ देशातील सुरक्षासंबंधी मोहिमेत, चकमकीत धारातीर्थी पडलेल्या सीमा सुरक्षा बल व इतर तत्सम निमलष्कर दलातील सदस्य/त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत व महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असलेल्या भारतीय सैन्यदलातील शौर्यपदक व सेवापदक धारकांना पुरस्कार म्हणून देण्यात येणारे एकरकमी रोख अनुदान तसेच मरणोत्तर शौर्यपदक धारकांच्या विधवा/अवलंबितांना देण्यात येणारे मासिक अनुदान या आर्थिक मदतीपैकी ५०% रक्कम शासकीय अनुदानातून व उर्वरित ५०% रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता (कारगील) निधीमधून घेण्यात आलेल्या व राष्ट्रीयकृत बँकेत गुंतविण्यात आलेल्या मुदत ठेवीच्या रकमेवरील व्याजातून देण्याची तरतूद आहे.

०२. मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधीमध्ये येणारी रक्कम ही केवळ राष्ट्रीयकृत बँकात गुंतविलेल्या मुदत ठेवींच्या व्याजातून होत होती. या व्याजाव्यतिरिक्त इतर कोणतेही मिळकतीचे पर्याय उपलब्ध नसल्यामुळे व व्याजाची रक्कम ही खर्चाच्या रकमे पेक्षा अपूरी पडत असल्यामुळे मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधीमधून मुदत ठेवीत रकमा गुंतविल्यानंतर मुदतपूर्तीनंतर पुन्हा ठेवी करता आल्या नाहीत व मिळालेल्या ठेवीची मुद्दलाची रक्कम खर्च करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधीमधील रक्कम संपुष्टात येत असल्याने वरील योजनांसाठी शासकीय निधीतून १०० टक्के अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

०३. युध्दात, युध्दजन्य परिस्थितीमध्ये, तसेच देशातील सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत / देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या राज्यातील सैनिकांच्या वारसांना/ अपंगत्व आलेल्या सैनिकांना/देशातील सुरक्षासंबंधी मोहिमेत, चकमकीत धारातीर्थी पडलेल्या सीमा सुरक्षा बल व इतर तत्सम निमलष्कर दलातील सदस्य/त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत या योजनेअंतर्गत खालील नमूद लाभार्थ्यांस पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | जवानाचे नाव / पत्ता | शहीद / अपंगत्व प्राप्त झाल्याचा दिनांक | अनुज्ञेय रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| **अ) शहीद** - सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६० - इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम योजनेतर १०२ (००) (०४) धारातीर्थी पडलेल्या सैन्यातील जवानांच्या विधवांना आर्थिक मदत. **(२२३५ २६०८)** | | | |
| १. | शिपाई संदिप पांडूरंग गायकर | देशांतर्गत सुरक्षा संबंधी ऑपरेशन रक्षक मोहिमेत (जम्मू-काश्मीर) किश्तवाड जिल्हयात दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत दिनांक २२ मे २०२५ रोजी धारातीर्थी पडले. | १,००,००,०००/- |
| | | एकूण | १,००,००,०००/- |
| **ब) अपंगत्व** - मागणी क्रमांक ए-५ प्रधानशीर्ष -२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६० - इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम योजनेतर १०२ (००) (०४) धारातीर्थी पडलेल्या सैन्यातील जवानांच्या विधवांना आर्थिक मदत. **(२२३५ २६०८)** | | | |
| १. | कॉन्स्टेबल/चालक जावीद अहमद शेख आमीन | दि.१८ एप्रिल, २०२० रोजी देशांतर्गत सुरक्षा संबंधी मोहिमेत अहदबाबा क्रॉसिंग, सोपोर, जिल्हा-बारामुल्ला जम्मू काश्मीर येथे शत्रुशी झालेल्या गोळीबारात डाव्या हाताला गोळी लागून गंभीर जखमी होऊन ७४% अपंगत्व आले. | ६०,००,०००/- |
| २. | लान्स नायक संतोष वसंत खिरकाडे | दिनांक १० डिसेंबर, २०१८ रोजी नियंत्रण रेषेवरील पूंछ जिल्हयातील परविंदर पोस्ट येथे ऑपरेशनल रक्षक या मोहिमेअंतर्गत डयुटी करत असताना रॉकेट लॉन्चर (८४ मिमी) च्या मोठया स्फोटक गोळयाचा आवाज झाल्यामुळे त्यांच्या डाव्या कानाची श्रणशक्ती कमी झाल्यामुळे त्यांना २०% अपंगत्व आले. | ५,००,०००/- |
| ३. | कॉन्स्टेबल/जीडी फारूकी शाहरूखखान आजीज खान | दि.११ जानेवारी २०२३ रोजी झारखंड राज्यातील पश्चिम सिंहभूम जिल्ह्यात जुव्हेंटस या मोहिमे अंतगत नक्षलविरोधी कारवाईमध्ये बॉम्बस्फोट (IED) आणि गोळीबार झाल्याने त्यांच्या दोन्ही कानांना ४९% कायमचे अपंगत्व आले. | ३४,००,०००/- |
| | | एकूण | ९९ लक्ष |
| | | एकूण (अ व ब) | १.९९ कोटी |

०४. महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असलेल्या भारतीय सैन्यदलातील शौर्यपदक व सेवापदक धारकांना पुरस्कार म्हणून देण्यात येणारे एकरकमी रोख अनुदान तसेच मरणोत्तर शौर्यपदक धारकांच्या विधवा/अवलंबितांना देण्यात येणारे मासिक अनुदान या योजनेअंतर्गत खालील नमूद लाभार्थ्यांस पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | शौर्य/सेवापदक धारकाचे नाव | प्राप्त शौर्य/सेवापदक व पदक प्राप्त झाल्याचा दिनांक | अनुज्ञेय (रुपये) रक्कम- (१००% शासकीय निधीतून) |
|---|---|---|---|
| १ | सुभेदार (ऑ.कॅप्टन) संदीप बाबासाहेब जाधव | सेना पदक (शौर्यपदक) दि.२६.०१.२०१५ | ५,००,०००/- |
| २ | कमांडर कौस्तब बॅनर्जी | नौसेना पदक (शौर्यपदक) दि.१५.०८.२०२३ | १२,००,०००/- |
| ३ | एअर व्हाईस मार्शल सुहास प्रभाकर भंडारे | अति विशिष्ट (सेवा पदक) दि.२६.०१.२०२५ | २,००,०००/- |
| ४ | रियर ॲडमिरल राहूल विलास गोखले | युद्ध सेवा पदक (शौर्यपदक) दि.१५.०८.२०२५ | २४,००,०००/- |
| ५ | मेजर प्रतिक बळीराम जाधव | मेन्शन इन डिस्पॅच पदक (शौर्यपदक) दि.१५.०८.२०२२ | ६,००,०००/- |
| | एकूण | | ४९ लक्ष |

०५. उपरोक्त परिच्छेद ०३ येथे नमूद योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुज्ञेय आर्थिक मदत “मागणी क्र. ए-५ लेखाशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६० इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, १०२- सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृत्तीवेतने, (००) (०४) देशांतर्गत सुरक्षासंबंधी मोहिमेत / चकमकीत धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या विधवांना / अवलंबितांना तसेच अपंगत्व प्राप्त झालेल्या अधिकारी / जवानांना आर्थिक मदत (अनिवार्य), ५०-इतर खर्च (२२३५ २६०८)” या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर अनुदानातून खर्ची करण्यात यावी.

०६. उपरोक्त परिच्छेद ०४ येथे नमूद योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुज्ञेय आर्थिक मदत "मागणी क्र.ए-४, प्रधानशीर्ष - २०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा- ८०० इतर खर्च (००) (०५) शौर्यासाठी पारितोषिके (अनिवार्य) -०५- बक्षिसे (२००५०११३) या या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर अनुदानातून खर्ची करण्यात यावी.

०७. प्रथमत: मा. मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधी मधील शिल्लक रक्कम खर्च करण्यात यावी.

०८. या प्रकरणी लाभार्थ्यांच्या निवासी पत्त्यानुसार 'आहरण व संवितरण अधिकारी, म्हणून जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर/ जळगाव/नाशिक/नांदेड/मुबई/सांगली/पुणे /कोल्हापूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

०९. सदर आर्थिक मदत ECS द्वारे देण्यात यावी व सदरहू शासन निर्णयांत दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.९९/व्यय-४ दि.१२.२.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३३११९०७१४५२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

URMILA POPAT SAWANT

Digitally signed by URMILA POPAT SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=532e1c167ebaaff43f5811aa7e45b8f790eb47c4f4cdf5bad586d61ab9901df2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C586C9348CA72192AB033313815E031BC4374F8A3A8575A392F3FE875E8661EC, cn=URMILA POPAT SAWANT
Date: 2026.03.31 19:08:32 +05'30'

**(उर्मिला सावंत)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई,
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई,
३. महालेखापाल (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा) महाराष्ट्र, मुंबई-३२,
४. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे-४११००१.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, (अहिल्यानगर/जळगाव/नाशिक/परभणी/मुबई/ सांगली/ पुणे /कोल्हापूर)
६. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,(अहिल्यानगर/ जळगाव/नाशिक/नांदेड/मुबई/ सांगली/पुणे /कोल्हापूर)
७. सह संचालक, लेखा व कोषागार, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई ३२,
८. श्रीम. दिपाली संदिप गायकर, मु.करंडी, पो.ब्राम्हणवाडा, ता.अकोले, जि.अहिल्यानगर ४२२६१०
९. कॉन्स्टेबल/चालक जावीद अहमद शेख आमीन, पिलखोड ता. चाळीसगाव,जि.जळगाव - ४२४१०१
१०. लान्स नायक संतोष वसंत खिरकाडे,मु.पो.म्हेळुस्के, ता.दिंडोरी, जि.नाशिक-४२२२०२
११. कॉन्स्टेबल/जीडी फारूकी शाहरूखखान आजीज खान, मु.टाकली, पो.लखमापूर, ता.माहूर जि.नांदेड-४३१७२१

१२.सुभेदार (ऑ.कॅप्टन) संदीप बाबासाहेब जाधव, मु.पो.कोडोली ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर-४१६११४

१३.कमांडर कौस्तब बॅनर्जी, घर नं.४०२, बिल्डींग-गोल्डफिंच न्याती ऐंकलेव, मोहम्मदवाडी रोड,पुणे-४११०६०

१४.एअर व्हाईस मार्शल सुहास प्रभाकर भंडारे, घर नं.३२४९, भंडारे कॉलनी मु.पो.ता.आटपाडी, जि.सांगली-४१५३०१

१५. व्हाईस ॲडमिरल राहूल विलास गोखले, १२-सोपानबाग, घोरपडी गाव, पुणे-४११००१

१६.मेजर प्रतिक बळीराम जाधव, मु.पो.रूम नं.५७, हेंद्रे बिल्डींग, वी.पी.रोड,प्रार्थना समाज, गिरगांव मुबई-४००००४

१७.वित्त विभाग (व्यय ४) ,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

१८.सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन २५, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

१९.निवड नस्ती (२ प्रती),

२०. संग्रहार्थ.